# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक ९ जुलै, २०२५**

## सार्वजनिक बांधकाम विभाग

## कपात सूचनांची एकूण संख्या - ४३

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१६, गृहनिर्माण**<br>**बाब क्रमांक: ९८, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (१) | ८४७ | १० | वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या येरवडा येथील जाई जुई व इतर शासकीय निवासी इमारतींची दुरावस्था झालेली असणे, सदर इमारतीमध्ये अनेक शासकीय अधिकारी व कर्मचारी कुटुंबासह वास्तव्यास असल्याने त्यांना चांगल्या निवासस्थानाची व्यवस्था असणे गरजेचे, त्यामुळे सदर ठिकाणी इमारतीच्या आवश्यक असलेल्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध होऊन तातडीने दुरुस्ती करणे गरजेचे याबाबत शासनाने करावयाचे कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | ८५१ | १० | शास्त्रीनगर, येरवडा येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निवासी बैठी चाळ येथे रस्ते, लाईट, पाणी, सार्वजनिक शौचालय तसेच इतर कामे करणे आवश्यक असणे, सदर कामे करण्यासाठी निधी उपलब्ध झाल्यास नागरिकांना चांगले वास्तविकरणाचे ठिकाण उपलब्ध होईल तसेच रात्री महिलांना या ठिकाणी सुरक्षित वातावरण उपलब्ध होईल, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (३) | ७७१ | १० | उमरेड येथील सार्वजनिक बांधकाम विभाग यातील उपविभागातील रिक्त पदे यामध्ये कनिष्ठ लिपिक (मागील आठ महिन्यापासून रिक्त आहे) तसेच नवीन इमारती या मध्ये १) तहसील कार्यालय उमरेड परिसरात नवीन अर्जनविस इमारत आवश्यक.२) नवीन विश्राम गृह इमारत आवश्यक. तसेच माझ्या उमरेड मतदार संघातील इमारत दुरुस्ती या मध्ये १) औदयोगीक प्रशिक्षण संस्था उमरेड. a) तांत्रिक शाळा b) वस्तीगृह २) भुमीअभिलेख कार्यालय इमारत. ३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे वस्तीगृह उमरेड तसेच माझ्या उमरेड मतदार संघातील कार्यालयीन इमारत करिता जागा यामध्येउमरेड न्यायालयातील न्यायाधीश निवासस्थाना करिता जागा आवश्यक. निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (४) | ८४६ | १० | भोईवाडा पोलीस वसाहत, परेल व नायगाव पोलीस मुख्यालय १ ते ९ वसाहत व न्यु पोलीस वसाहत नायगाव येथील अनेक विकासकामे निधी अभावी प्रलंबित असणे, भोईवाडा पोलीस वसाहत, गोविंदजी केणी रोड, परेल या इमारतीचे प्लास्टर व रंगरंगोटीचे काम, नायगाव पोलीस मुख्यालय, इमारत क्र. १ ते ९ या इमारतीमधील सार्वजनिक शौचालयाचे बाहेरील प्लास्टरचे काम, नायगाव पोलीस मुख्यालय, इमारत क्र.१ ते ९ मधील आवारातील रस्त्याचे काम, न्यु पोलीस वसाहत, नायगाव येथील इमारतींची संरक्षण भिंत बांधणे, न्यु पोलीस वसाहत, नायगाव येथील रूम मधील प्लास्टर आणि स्टाईल्सची कामे आदी कामे प्रलंबित असणे, ही कामे न झाल्याने पोलीस वसाहतीमधील नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिड व असंतोषाची भावना सदर विकासकामे मार्गी लागावीत यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. वरुण सरदेसाई** |
| (५) | ८०० | १०० | वांद्रे (पूर्व) मध्ये शासकीय वसाहतीमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवासस्थानांची अत्यंत वाईट दुर्दशा झाली असणे, इमारतीमधील सदनिका पावसामध्ये पाण्याची गळती लागणे, सदनिकांमधील व बाहेरील भागांमधील स्लॅब वारंवार कोसळून रहिवाशी अधिकारी कर्मचाऱ्यांना यामुळे दुखापत देखील होणे, सदनिकांच्या दरवाजे व खिडक्या संपूर्णतः मोडकळीस आलेल्या असणे, या इमारती अत्यंत धोकादायक म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून घोषित करण्यात आलेल्या असून सुद्धा या रहिवाशांकरीता पर्यायी निवासव्यवस्था केलेली नसणे, यामुळे प्रथमतः या रहिवाशांची पर्यायी व्यवस्था करून धोकादायक इमारतीचा पुनर्विकास करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | ८०९ | १०० | वांद्रे (पूर्व) येथील पोष्ट कार्यालय उच्च न्यायालयाच्या प्रस्तावित इमारतीमुळे निष्कासित करण्यात आलेले असणे, सदर पोष्ट कार्यालयास शासनाने अद्याप पर्यायी जागा दिलेली नसणे, पोष्ट कार्यालयाचे पुनर्वसन करणे आवश्यक असणे, शासनाकडे वारंवार याबाबत मागणी करून सुद्धा शासनाचे पोष्ट कार्यालयास पर्यायी जागा देण्याबाबत होत असलेले दुर्लक्ष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | ८१० | १०० | वांद्रे (पूर्व) येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय उच्च न्यायालयाच्या प्रस्तावित इमारतीच्या कामामुळे निष्कासित केलेले असणे, सदर इमारतीला पर्यायी अन्यत्र कुठेही जागा दिलेली नसणे, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालयाकरीता पर्यायी जागा देण्याबाबतची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (८) | ८३५ | १०० | वांद्रे (पूर्व) येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहाची झालेली दुरावस्था, विश्रामागृहामधील कक्षामध्ये दुरुस्ती करण्याची आवश्यकता, अपुरा कर्मचारी वर्ग, परिसराचे सुशोभीकरण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**बाब क्रमांक: १००, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. जयंत पाटील** |
| (९) | ७३७ | १०० | सांगली जिल्ह्यातील लेखाशिर्ष ३०५४-२४१९ रस्ते व पुल दुरुस्ती परिक्षण कार्यक्रमातंर्गत शा.निर्णय क्र.जिपर-२६२४/प्र क्र ७९/ बांध-३ दि. १३ ऑगस्ट,२०२४ रोजी सहा कामे मंजूर केली असून २००.००/- लाखचा निधी मंजुर, दिनांक ०७ मार्च,२०२४ रोजीच्या शा.निर्णयानुसार ७ कामे मंजुर असून २००.००/- लाखाचा निधी मंजुर असून उक्त १३ कामे पूर्ण झाली असून अद्याप निधी उपलब्ध झालेला नसणे, सदरहू रस्त्याच्या कामांचा मंजूर निधी त्वरीत देण्याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अनिल मांगुळकर** |
| (१०) | ८६३ | १० | यवतमाळ शहरातील बांधकाम विभागामार्फत बांधत असलेल्या दर्डा नाका ते बजरंग चौक या रस्त्याचे काम गेल्या १ वर्षा च्या आधीपासून चालू आहे पण आज पर्यंत ते पूर्ण होऊ शकले नाही तसेच शहरातील नव्याने तयार झालेले अनेक रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले आहे त्याची सर्व रस्त्याची चौकशी करावी तरी माझ्या मतदार संघातील यवतमाळ यांना निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (११) | ६६४ | १० | नागपूर- उमरेड चौपदरी महामार्ग क्र. ३५३ तयार झाल्यापासून अपघाताचे प्रमाण कमी होणे, मात्र उमरेड ते भिवापूर या मार्गाला चौपदरीकरणाची प्रतिक्षा असणे, नागपूर-उमरेड रस्त्याचे काम सुरु झाले त्यावेळी चौपदरी रस्ता भिवापूरपर्यंत होईल अशी येथील जनतेची अपेक्षा असणे, मात्र रस्ता फक्त उमरेडपर्यंत होणे, हा रस्ता फक्त उमरेडपर्यंतच होणे, हा रस्ता अरुंद असल्याने अपघातापर्यंतच होणे, हा रस्ता अरुंद असल्याने अपघातांचे प्रमाण वाढणे, या मार्गावरुन नागपूर- पवनी, वडसा, गडचिरोली यासारख्या शहरांसाठी प्रवासी बसेस असणे, वाळूवाहतूक करणारे अवजड वाहनेही धावत असणे, यामुळे येथे सततची वर्दळ धोकादायक ठरत असल्याने हा रस्ता चौपदरी व्हावा अशी येथील आग्रही मागणी असणे. याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१२) | ६६७ | १० | उमरेड जि. नागपूर तालुक्यातील बेला व्हाया पिपरा - सिसी मार्गाच्या मोठया प्रमाणावर दुरावस्था झाली आहे, त्यामुळे या रस्त्यावरुन वाहन चालविणे कमीच झाले असून येथे सातत्याने लहान- मोठे अपघात होत आहेत येथे नव्या रस्त्याच्या निर्मितीसाठी ४३ कोटींचा निधी मंजूर झाला आहे मात्र वर्क ऑर्डर मिळाली काम सुरु झालेले नाही, याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनील राऊत** |
| (१३) | ६८२ | १० | विक्रोळी पूर्व मधील टागोरनगर येथील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झालेली असून या भागातील आबा हरि राणे मार्ग टागोर नगर रस्ता अत्यंत नादुरुस्त झाल्यामुळे पावसाळयात नागरिकांना चिखलातून वाट काढत जावे लागणार आहे. उक्त रस्ता दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी संबंधीत विभागाकडे पत्रव्यवहार करुनही अदयाप दुरुस्ती झालेली नाही, आबा हरि राणे मार्ग टागोर नगर रस्त्याच्या दुरुस्तीकरिता शासनाने किती निधीची तरतूद करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१४) | ६८३ | १० | विक्रोळी पूर्व मधील टागोरनगर येथील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झालेली असुन या भागातील राम हजारे मार्ग परेश पारकर मार्ग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्टेशन रस्ता अत्यंत नादुरुस्त झाल्यामुळे पावसाळयात नागरिकांना चिखलातून वाट काढत जावे लागणार असणे, उक्त रस्ता दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी संबंधीत विभागाकडे पत्रव्यवहार करुनही अदयाप दुरुस्ती झालेली नसणे, उक्त राम हजारे मार्ग परेश पारकर मार्ग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्टेशन रस्त्याच्या दुरुस्तीकरिता निधीची तरतूद करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१५) | ६८४ | १० | विक्रोळी पूर्व मधील टागोरनगर येथील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झालेली असुन या भागातील राम हजारे मार्ग मच्छिमार्केट पासून ते खामकर मसाला घरापर्यत रस्ता अत्यंत नादुरुस्त झाल्यामुळे पावसाळयात नागरिकांना चिखलातून वाट काढत जावे लागणार असणे, उक्त रस्ता दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी संबंधीत विभागाकडे पत्रव्यवहार करुनही अदयाप दुरुस्ती झालेली नसणे, राम हजारे मार्ग मच्छिमार्केट पासून ते खामकर मसाला घरापर्यत रस्त्याच्या दुरुस्तीकरिता निधीची तरतूद करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१६) | ६८६ | १० | विक्रोळी पूर्व मधील टागोरनगर येथील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झालेली असुन या भागातील पगारे मार्ग टागोर नगर इमारत क्र.३० ते ३४ रस्ता अत्यंत नादुरुस्त झाल्यामुळे पावसाळयात नागरिकांना चिखलातून वाट काढत जावे लागणार असणे, उक्त रस्ता दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी संबंधीत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | विभागाकडे पत्रव्यवहार करुनही अदयाप दुरुस्ती झालेली नसणे, पगारे मार्ग टागोर नगर इमारत क्र.३० ते ३४ रस्त्याच्या दुरुस्तीकरिता निधीची तरतूद करण्याची आवश्यकता, शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१७) | ६८८ | १० | विक्रोळी पूर्व मधील टागोरनगर येथील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झालेली असुन या भागातील कै.हिरे मार्ग टागोर इमारत क्र २१ ते २६ रस्ता अत्यंत नादुरुस्त झाल्यामुळे पावसाळयात नागरिकांना चिखलातून वाट काढत जावे लागणार असणे, उक्त रस्ता दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी संबंधीत विभागाकडे पत्रव्यवहार करुनही अदयाप दुरुस्ती झालेली नसणे, कै.हिरे मार्ग टागोर इमारत क्र २१ ते २६ रस्त्याच्या दुरुस्तीकरिता निधीची तरतूद करण्याची आवश्यकता, शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१८) | ६९३ | १० | भांडूप पूर्व कडून पश्चीमेस जाण्याकरिता नाहूर मार्गावरुन जावे लागत आहे तसेच भांडूप पूर्वला पेट्रोल पंप नसल्यामुळे पश्चीमेला मोठा वळसा घालून पेट्रोल भरण्याकरिता जावे लागत असून त्यामुळे नागरिकांसह वाहन चालकांकडून सातत्याने भांडूप पूर्व - पश्चीमेला जोडणारा मोठा उड्डाण पुल बांधण्याबाबत मागणी होत असणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबधित विभागाकडे पत्रव्यवहार देखील केलेला असणे, उक्त मागणीनुसार भांडूप पूर्व-पश्चीम जोडणारा मोठा उडडाण पुलाबाबत प्रस्ताव तयार करुन मान्यतेकरिता पाठविण्याची आवश्यकता, शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. वरुण सरदेसाई** |
| (१९) | ८३२ | १०० | सिंधदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील वडाचापाट गावातील मसदे तिठा नाक्यावरून पाटकरवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर अस्तित्वात असलेला पूल अत्यंत जिर्ण झालेला असणे, थोडा पाउस पडल्यानंतर या पुलावरून होणारी वाहतूक पुलावरून पाणी जात असल्याने बंद होणे, सदर पुलाचे नव्याने उंची वाढवून बांधकाम होणे आवश्यक, याकरिता अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सिंधुदुर्ग अंतर्गत रस्त्यांचे परिरक्षण व दुरुस्ती अंतर्गत शासनाने वडाचापाट गावातील मसदे तिठा नाक्यावरून पाटकरवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर पुलाची उंची वाढवून नव्याने बांधकाम करणे बाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**बाब क्रमांक: १०२, रूपये:- १०,००,००,००,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (२०) | ८४८ | १० | पीएमआरडीच्या अंतर्गत रिंग रोड मध्ये लोहगाव आणि वाघोली ही दोन गावे पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये येत असून या गावांचा विकास आराखडा (डीपी प्लॅन) |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | मंजूर नसल्याने शेतकऱ्यांना मोबदला मिळण्यास अडचण येणे, तसेच रिंग रोड मध्ये जात असलेल्या इतर गावातील शेतकऱ्यांना त्यांच्या जागेचा पाचपट मोबदला दिला जाणे, परंतु या दोन गावातील शेतकऱ्यांना पाचपट प्रमाणे न देता केवळ दुप्पटच देत असल्याने त्यांचेवर अन्याय होत असल्याने या गावातील रिंग रोडचे काम प्रलंबित राहिले आहे. या दोन्ही गावातील शेतकऱ्यांसमवेत शासनाने मोबदला देण्याबाबत चर्चेतून प्रश्न मार्गी लावा. (एफएसआय /टीडीआर किंवा रोख स्वरूपात) याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२१) | ८५० | १० | पुणे जिल्हा हा अतिशय जलद गतीने विकसित होत असून सध्या पुणे शहर व जिल्ह्यातील वाहतुकीचा प्रश्न अतिशय गंभीर होणे, नागरिकांना तासंतास वाहतूक कोंडीत थांबावे लागणे, पुणे जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून वर्तुळाकार (रिंगरोड) रस्ता करणेबाबत अनेक वर्षापासून प्रस्तावित असणे, सदर रस्त्याचे काम काही ठिकाणी सुरू झाले होते परंतु काही काळानंतर ते बंद करण्यात आल्यामुळे, सदरचा रिंग रोड जलद पूर्ण होणेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होणे, सदरचा रिंग रोड तातडीने पूर्ण करणे आवश्यक असल्याने, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (२२) | ६६६ | १० | भिवापूर जि. नागपूर तालुक्यातील गाव - खेडयांना मुख्यमार्गापासून जोडणाऱ्या अनेक पोहच रस्त्यांची दुरावस्था झाली असणे, उमरेड-वरोरा या राष्ट्रीय महामागाला जोडणाऱ्या मालेवाडा व उखळी या दोन्ही गावांना जाताना रस्त्याच्या दुरावस्थेमुळे त्रास सहन करावा लागत असणे. मालेवाडा रस्त्याची दुरावस्था झाल्यामुळे येथे येणारी राज्य परिवहन मंडळाची बस बंद झाली असल्याने विद्यार्थी, वृध्द, महिला यांना त्रास सहन करावा लागत असणे, याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. वरुण सरदेसाई** |
| (२३) | ८३३ | १०० | राज्यातील दुर्लक्षित झालेला प्रमुख मार्ग म्हणजे मुंबई-गोवा महामार्ग, या महामार्गाचे गेली १० वर्षापेक्षा जास्त कालावधीमध्ये काम रखडलेले असणे, स्थानिक नागरिकांच्या जमिनी संपादित करून अद्याप सदर मार्ग अपूर्णावस्थेत असणे, मुंबई-गोवा महामार्गावर रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे वारंवार वाहनांचे अपघात होऊन मोठ्या प्रमाणात नागरिकांचे प्राण जाणे, शासनाने स्वतः लक्ष देऊन सदर मुंबई - गोवा महामार्गाचे काम पूर्ण करून घेण्याची आवश्यकता, शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५९, सार्वजनिक बांधकामे**<br>**बाब क्रमांक: १०४, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (२४) | ८२१ | १० | चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी, सिंदेवाही व सावली तालुक्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालय एकाच ठिकाणी सुरु करून नागरिकांना सोई उपलब्ध करून देणे शासनाचे धोरण असणे, मात्र या तीनही तालुक्यातील शासकीय व निम शासकीय कार्यालय वेगवेगळ्या ठिकाणी असल्याने नागरिकांना शासकीय काम करताना मानसिक व अर्थिक त्रास सहन करावा लागत असल्यामुळे त्यांच्यात पसरलेले तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी, सावली व सिंदेवाही येथे असलेल्या मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे विस्तार करून त्याठिकाणी पुन्हा मजले व इतर आलेल्या मोकळया जागेवर शासकीय इमारत बांधण्यासाठी निधीसह मंजुरी देण्याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२५) | ८२२ | १० | चंद्रपूर जिल्ह्यातील सावली हे तालुका मुख्यालयाचे ठिकाण असून या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासकीय विश्रामगृह नसणे, त्यामुळे व्हीआयपी तसेच शासकीय कामकाजसाठी येणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सावली मुक्कामी राहतो म्हटल्यास मोठी गैरसोय निर्माण होणे, या कारणास्तव सावली येथे शासकीय विश्राम गृहाचे बांधकाम करण्याची मागणी करून सुध्या अद्यापही विश्रागृहास परवानगी मिळालेली नसल्याने नागरिकांत पसरलेले तीव्र असतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्ह्यातील सावली येथे नवीन शासकीय व्ही आय पी विश्रामगृह मंजूर करून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फतीने बांधकाम करण्यासाठी व त्यासाठी आवश्यक असलेला निधी मंजूर करण्यासाठी शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ११५, रूपये:- १०,००,००,००,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (२६) | ७०८ | १० | वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघातील मौजे मांजरी खुर्द, कोलवडी, ता. हवेली येथून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्र. १३३ (केशवनगर–मांजरी–कोलवडी–उरुळी कांचन) हा रस्ता प्रचंड वर्दळीचा असून परिसरातील खराडी, वाघोली, आव्हाळवाडी, मांजरी खुर्द, हडपसर, केशवनगर, साडेसतरा नळी, मुंढवा तसेच पुणे शहरातील मोठ्या लोकवस्तीसाठी महत्त्वाचा दळणवळण मार्ग असणे, सदर रस्ता अत्यंत अरुंद आणि जीर्ण अवस्थेत असून यावर वारंवार अपघात होत असल्याने नागरिकांचे प्राण धोक्यात येणे, यासंदर्भात अनेक वेळा स्थानिक व वर्तमानपत्रांमधून |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आवाज उठवला गेला असूनही भूसंपादनाची प्रक्रिया अद्याप प्रलंबित असल्याची धक्कादायक बाब निदर्शनास येणे, दिनांक ८ फेब्रुवारी २०२५ रोजी मांजरी खुर्द येथे आयोजित जनता दरबार कार्यक्रमात याबाबत चर्चा झाली होती. त्या वेळी उपस्थित सर्कल स्तरावरील अधिकाऱ्यांनी भूसंपादन कार्यवाही करण्यात येईल असे आश्र्वासित करणे, तथापि, जवळपास पाच महिने उलटूनही कोणतीही ठोस कार्यवाही न होणे. आणि अपघातांची शक्यता अधिकच गंभीर होणे, सबब सदर गंभीर विषयाची तातडीने दखल घेऊन नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या रस्त्याचे भूसंपादन व रुंदीकरणाची करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२७) | ८५५ | १० | वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघातील राज्यमार्ग ६८, कळस लोहगाव वाघोली हा रस्ता वाहतुकीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणात रहदारी असते, सदर रस्ता हा वाहतुकीसाठी सुव्यवस्थेत करणेसाठी निधीची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२८) | ८५६ | १० | वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघ आणि शिरूर हवेली विधानसभा मतदारसंघातून जाणारा राज्य महामार्ग क्रमांक ६८ या रस्त्याची वाघोली केसनंद यादरम्यान अतिशय दुरावस्था झालेली असणे, सदर रस्ता करणे अत्यंत आवश्यक, तसेच मौजे केसनंद, तालुका हवेली या गावात सातत्याने वाहतूक कोंडी होत असल्याने या गावात वाघोली केसनंद अष्टापूर रस्त्यावर पूर्व पश्चिम किंवा अष्टविनायक मार्ग लोणीकंद केसनंद थेऊर या मार्गात वर उत्तर दक्षिण असा उड्डाणपूल करणे आवश्यक, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ११६, रूपये:- ५,००,००,००,०००/-**<br>**श्री. गजानन लवटे** |
| (२९) | ८१६ | १०० | उपराई तालुका दर्यापूर व भालसी तालुका भातकुली जिल्हा अमरावती या दोन्ही गावांच्या मध्यभागी पूर्णा नदी वाहत असून या नदी काठावर उपराई गावात हजारो वर्षांपूर्वीचे ऐतिहासिक असे "शाह दिलावर बाबाचा दर्गा" आहे. या दर्ग्याला राज्य शासनाचा तीर्थक्षेत्राचा 'क' वर्ग याचा दर्जा प्राप्त असून या ठिकाणी राज्यभरासह देशाच्या विविध भागातून लाखो भाविक व यात्रेकरू येत असतात. उपराई व बालसी गावाच्या मध्यभागातून पूर्णा नदी वाहत असून सदर नदीवर पुल नसल्याने या दोन्ही गावातील नागरिकांना गावांमध्ये ये-जा करण्यासाठी, तसेच दर्ग्याचे दर्शन घेण्यासाठी येणाऱ्या भाविकांना देखील किमान ५० ते ६० किलोमीटर अंतरावरून वळण घेऊन यावे लागते. अन्यथा बऱ्याच वेळा नागरिक आपला जीव धोक्यात |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | घालून नदीपात्रातून येजा करीत असतात त्यामुळे अनेकदा अपघाताच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे पूर्णा नदीवर या दोन्ही गावांना जोडण्याकरता पुलाचे बांधकाम करण्याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३०) | ८१७ | १०० | दर्यापूर ते आसेगाव क्रमांक २७८ महामार्ग खाल्लर ते उपराई ग्राभा क्र.२९ या मार्गे करण्याबाबतची मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून गेल्या अनेक वर्षांपासून केली जात आहे. सदरचा रस्ता अंजनगाव,कापूस तळणी, कसबेगवान, साखरी खल्लार, चंद्रपूर खल्लार बस स्टॉप पूर्व दिशा, उपराई, भालशी, उदापूर वल्ली वायगाव खार तळेगाव, वडगाव या मार्गे करण्यात यावा अशी या ग्रामस्थांची मागणी असून या रस्त्यामुळे अंजनगाव मधील नागरिकांचे २० किलोमीटर पर्यंतचे अंतराचे वेळ वाचणार असल्याने याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ११७, रूपये:- १५,००,००,००,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (३१) | ८३८ | १० | मौजे धामापूर (तालुका-मालवण, जिल्हा-सिंधुदुर्ग) मोगरणे-जाधववाडी ग्रा.मा.३९० रस्ता वनक्षेत्रात खडीकरण करणे अंतर्गत असून त्याची एकूण लांबी ०/०० ते ४.०० कि.मी.असून त्यापैकी साखळी क्र.०/१७० कि.मी. ते १/०० कि.मी. हा रस्ता कच्चा स्वरुपाचा असून त्याचे खडीकरण करणेस परवानगी मिळणेबाबत उप वनसंरक्षक, सावंतवाडी वन विभाग, सावंतवाडी यांनी त्यांचे पत्र क्रमांक व/नोसेल/४०१२/२०२४-२५, दिनांक ०८ जानेवारी, २०२५ नुसार कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हापरिषद, सिंधुदूर्ग यांना कळविणे, धामापूर-मोगरणे-जाधववाडी रस्त्याचे काम वनक्षेत्रामध्ये करणेसाठी वन (संरक्षण एवं संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गतचा प्रस्ताव तयार करुन सा.बा.विभाग, जिल्हापरिषद, सिंधुदूर्ग यांचे तांत्रिक अभियंता यांनी उप वनसंरक्षक, सावंतवाडी वन विभाग, सावंतवाडी यांचेकडे सादर करणे आवश्यक असणे, परंतु अद्वापपर्यन्त कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हापरिषद, सिंधुदूर्ग यांचेकडून उप वनसंरक्षक, सावंतवाडी वन विभाग, सावंतवाडी यांचेकडे प्रस्ताव सादर केला नसल्याने धामापूर-मोगरणे-जाधववाडी रस्त्याचे खडीकरण-डांबरीकरणाचे काम प्रलंबित असणे, सबब, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हापरिषद, सिंधुदूर्ग आणि उप वनसंरक्षक, सावंतवाडी वन विभाग,सावंतवाडी यांनी समन्वय साधून प्रलंबित असलेले साखळी क्र.०/१७० कि.मी. ते १/०० कि.मी. या रस्त्याचे खडीकरण-डांबरीकरणाचे प्रलंबित असलेले काम पूर्ण करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (३२) | ८४५ | १० | मालाड पश्चिम येथील मौजे धारवली गावातील रस्त्याची अत्यंत दुरावस्था झालेली असणे, कार्यकारी अभियंता (अंधेरी), सार्वजनिक बांथकाम विभाग यांनी १० वर्षांपूर्वी रस्त्याचे बांधकाम झालेले असणे, पण रस्त्याची देखभाल योग्य प्रकारे न झाल्याने रस्त्याची दुरावस्था झालेली असणे,नवीन रस्त्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून वारंवार केली जाणे, रस्त्याची दुर्दशा झाल्याने नागरिकांना विशेषकरुन ज्येष्ठ नागरिकांना त्याचा त्रास होणे, शासनाकडून रस्ता बांधण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे धारवली गावच्या ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेला रोष व असंतोषाची भावना, रस्ता निर्माण करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ११८, रूपये:- ५,००,००,००,०००/-**<br>**श्री. सुनिल प्रभू** |
| (३३) | ७६३ | १० | “पालघर जिल्ह्यातील मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील घोडबंदर ते अच्छाडपर्यंतच्या १२० किमी लांबीच्या रस्त्याच्या काँक्रीटीकरणाचे काम पूर्ण होण्याआधीच केलेले काँक्रीटीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने महामार्गावर असंख्य खड्डे पडून महामार्गाची दयनीय अवस्था झाल्याचा गंभीर प्रकार दि.२९.०५.२०२५ रोजी निदर्शनास येणे, कॉक्रीटीकरणाचे काम पूर्ण होण्याआधीच खड्डे भरण्याची आणि महामार्गाची दुरुस्ती करण्याची नामुष्की महामार्ग प्राधिकरणावर ओढवणे, सदरहू १२० किमी लांबीच्या महामार्गावर व्हाईट टॉपींग, नऊ ठिकाणी लोखंडी पादचारी पूल आणि चार उड्डाणपुलाची कामे प्रस्तावीत करुन डिसेंबर २०२३ मध्ये काम सुरु करण्यात येणे, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे संबंधित अधिकारी अभियंता आणि ठेकेदाराच्या निकृष्ट व नियोजनशुन्य कामामुळे रस्त्यावर असंख्य खड्डे पडून प्रचंड वाहतुक कोंडी होऊन वाहनचालक व प्रवाशांची झालेली व होत असलेली प्रचंड गैरसोय, सदरहू महामार्गाच्या १२० किमी लांबीच्या रस्ते कॉक्रीटीकरणाच्या कामासाठी ६०० कोटी रुपये इतका निधी खर्च करुनही निकृष्ट दर्जाचे काम झाल्याने यामध्ये मोठ्या प्रमाणात अधिकारी व ठेकेदारांनी संगनमत करुन कोट्यावधी रुपयाचा आर्थिक घोटाळा केल्याचा प्रकार उघडकीस येणे, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कारवाई करण्याची आवश्यकता, शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १२०, रूपये:- १६,५०,००,००,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (३४) | ८५२ | १० | लाखो भाविकांच्या दृष्टीने महत्त्वाचा असणारा पालखी मार्ग जवळपास पूर्णत्वाला आलेला असणे या मार्गातील पिंपरी चिंचवड महापालिका हद्द दिघी ते कळस |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | (वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघातील) या ठिकाणचे रुंदीकरण, हडपसर येथील रेल्वे पुलाचे रुंदीकरण, जेजुरी येथील पुलाचे काम पूर्ण करणे फलटण नीरा लोणंद पंढरपूर मधील उर्वरित रस्ता पूर्ण करणे, वाखरी ते पंढरपूर यादरम्यान असणारा रेल्वे पूल करणे अशी कामे पूर्ण केल्यास पालखी मार्गाचे काम पूर्ण होईल आणि नागरिकांना चांगला मार्ग उपलब्ध होईल यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १२२, रूपये:- १०,००,००,००,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (३५) | ७४२ | १० | सांगोला तालुक्यातील अनेक रस्ते नादुरूस्त झाले असून ग्रामीण भागातील दळण वळण विस्कळीत झाले आहे. सांगोला तालुक्यातील वाटंबरे - अकोला- कडलास जवळा भोपसेवाडी - डिकसळ-नराळे रोड MDR ८७ कि.मी १०/७०० ते ३९/१९० या रस्त्यांची रूंदीकरणासह सुधारणा करणे व बचेरी शिंगोर्णी कटफळ अचकदाणी - सोनलवाडी या मंगेवाडी-वाटांबरे-निजामपूर-हनमंतगाव-सोनंद-भोपसेवाडी-घेरडी रोड MDR ८९ कि.मी ७/५०० ते ६४/०० या रस्त्यांची रुंदीकरणासह सुधारणा करणे अत्यंत गरजेचे असून, शासनाने सदर रस्त्याकरिता निधीची तरतूद करून शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-८**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४०५९, सार्वजनिक बांधकाम वरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १२४, रूपये:- ४१,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (३६) | ८६४ | १० | शहरातील मौजे खराडी, तालुका हवेली येथे सध्या असणारे तलाठी कार्यालय हे अत्यंत छोट्या जागेत सुरू असणे, खराडी गावाची लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढलेली असून या ठिकाणी स्थलांतरित होणाऱ्या नागरिकांची संख्या लक्षणीय असणे, सदर नागरिकांना तलाठी कार्यालयाशी निगडित असंख्य कामे असणे त्यामुळे खराडी येथे उपलब्ध असलेल्या जागेवर आद्ययावत तलाठी कार्यालय व मंडल अधिकारी कार्यालय उभारणे आवश्यक, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (३७) | ७७६ | १० | उमरेड येथील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका-कुही जिल्हा- नागपुर हे कार्याला प्रशासकीय इमारत, पहीला माळा, वडोदा रोड, कुही जि.नागपुर येथे असून सदर कार्यालयसाठी अपुरी जागा पडत असणे, सदर कार्यालयाला प्रशस्त नवीन इमारत उभारण्यास मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. गजानन लवटे** |
| (३८) | ८१९ | १०० | अंजनगाव सुर्जी येथील तालुका कृषी अधिकारी, तालुका बीज प्रक्षेत्र कृषी चिकित्सालय या कार्यालयाचे बांधकाम सन : २००१ मध्ये करण्यात आले होते. सद्यस्थितीत या कार्यालयाची इमारत जुनी व जीर्ण झाल्याने या कार्यालयात काम करणाऱ्या तसेच या कार्यालयात कामाकरिता येणाऱ्या शेतकरी व इतर नागरिकांना अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे या ठिकाणी सर्व सोयी सुविधांनी सुसज्ज अशी नवीन इमारत उभारण्याचे तालुका कृषी अधिकारी यांनी प्रस्तावित केले असून याकामाकरिता सुमारे ५ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. त्याचबरोबर या कार्यालयाच्या परिसरात गट क्र.५ व १७ मध्ये संरक्षक भिंतीचे बांधकाम करण्याकरिता सुमारे ३ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे याकरिता आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-८**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४०५९, सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १२६, रूपये:- १,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (३९) | ७४३ | १० | राज्यातील विविध ठिकाणी असलेल्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अंतर्गत कार्यालयाच्या प्रशासकीय इमारती संरक्षण भिंत व अंतर्गत रस्त्याच्या बांधकामासाठी निधीची तरतूद करण्याचे ठरविण्यात आले आहे. सोलापूर जिल्ह्यातील सांगोला येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय हे भाडे तत्वावर असून याठिकाणी राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाची प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी जागा उपलब्ध असून, प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-८**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १३१, रूपये:- २,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (४०) | ८३६ | १० | मालाड पश्चिमेकडील सामान्य रूग्णालय मालवणी मालाड हे अत्यंत महत्त्वाचे रूग्णालय असणे, मालाड पश्चिम मालवणी नजीकच्या परिसरातील हेच एकमेव सरकारी रूग्णालय असणे, असे असताना देखील या रूग्णालयात सुविधांचा अभाव असणे, पाच कक्षसेवकांच्या मंजुर पदांपैकी फक्त चारच कक्षसेवक कार्यरत असणे, शस्त्रक्रियागृह परिचर वर्ग ४ व व्रणोपचारक वर्ग-४ हि पदे रूग्णालय सुरू झाल्यापासून अद्यापपर्यंत भरलेली नसणे, रूग्णालयातील अधिकारी व कर्मचारी यांना अत्यावश्यक सेवा देता यावी या करिता रूग्णालयाच्या आवारात अधिकारी व |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | कर्मचारी यांच्यासाठी निवासस्थानाचे बांधकाम करण्यात आले. सार्वजनिक बांधकाम विभागाने निवासस्थानाची इमारत अद्याप रूग्णालयाच्या ताब्यात दिलेली नसणे, सुरक्षा रक्षक सेवा कार्यरत नसणे, मा. उपसंचालक आरोग्य सेवा मुंबई मंडळ ठाणे यांनी शासकीय आरोग्य सेवा संस्थांचे श्रेणीवर्धन व बांधकामासाठी आशियाई विकास बँक यांचे मार्फत अनुदान उपलब्ध करण्यासाठी रूग्णालयाचा श्रेणीवर्धनाचा प्रस्ताव शासनास २०२१ साली सादर करण्यात आलेला आहे. मात्र शासनस्तरावर मंजुरी प्रलंबित असणे, सामान्य रूग्णालय मालवणी मालाड हे संवेदनशील भागात कार्यरत असलेले रूग्णालय आहे. येथे मोठ्या प्रमाणावर बाहय रूग्ण उपचारार्थ येत असतात च आंतररूग्ण, प्रसुती रूग्ण डायलेसीस व अन्य रूग्ण दाखल होत असतात. सध्या रूग्णालयात कार्यरत असलेल्या सात नियमित वैद्यकिय अधिकाऱ्यांपैकी ०५ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असणे, परिणामी रुग्णांना योग्य आरोग्य सुविधा न मिळणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४१) | ८४३ | १० | मालाड पश्चिमेकडील सामान्य रूग्णालय मालवणी मालाड हे अत्यंत महत्त्वाचे रूग्णालय असणे, मालाड पश्चिम मालवणी नजीकच्या परिसरातील हेच एकमेव सरकारी रूग्णालय असणे, असे असताना देखील या रूग्णालयात सुविधांचा अभाव असणे, मा. उपसंचालक आरोग्य सेवा मुंबई मंडळ ठाणे यांनी शासकिय आरोग्य संस्थांचे श्रेणीवर्धन व बांधकामासाठी आशियाई विकास बॅन्क यांचे मार्फत अनुदान उपलब्ध करण्यासाठी यारुग्णालयाचा श्रेणीवर्धनाचा प्रस्ताव जा. क्रनियो/कक्ष-६/आविबॅक/श्रेणीवर्धनप्रस्ताव/२३१८०-८३/२१ दिनांक ०६.०७.२१ अनव्ये शासनास सादर केला असणे, आरोग्य संचालकांकडे ४ वर्ष सदर प्रस्ताव प्रलंबित असणे, अद्याप शासनस्तरावर मंजुरी मिळाली नसणे, अद्याप २०० खाटांचे श्रेणीवर्धन न झाल्याने रुग्णांचे हाल होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-८**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १३२, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (४२) | ८६१ | १० | ०वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघात येणाऱ्या श्री क्षेत्र लोहगाव येथे उपजिल्हा रुग्णालयाची स्थापना सन २०११ मध्ये करण्यात येणे, पुणे शहरातील ससून रुग्णालयावरचा ताण कमी करण्याच्या दृष्टीने व परिसरातील नागरिकांना उत्तम वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हाव्यात या हेतूने हे रुग्णालय नियोजित करण्यात येणे, सदर रुग्णालयाचे बांधकाम अंतिम टप्प्यात असून, ऑक्टोबर २०२५ पर्यंत हे रुग्णालय सुरू करण्यात येईल, लोहगाव पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट असून, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सद्यस्थितीत येथे वेगाने नागरीकरण होत आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड तसेच इतर जिल्ह्यांमधून व परराज्यांतून अनेक गरीब व मध्यमवर्गीय नागरिक येथे वास्तव्यास येणे, ससून किंवा खाजगी रुग्णालयांपर्यंत जाणे त्यांच्यासाठी आर्थिकदृष्ट्या अवघड असून त्यामुळे त्यांना उपचारासाठी अडचणींना सामोरे जावे लागणे, तसेच, लोहगाव परिसरात अंतर्गत व बाह्य रिंग रोडचे काम प्रस्तावित/सुरू असून, या परिसराचे भविष्यातील वाढते महत्व लक्षात घेता रुग्णालयाच्या १०० खाटांची क्षमता ही अपुरी पडेल. भविष्यात नव्याने शहरात हॉस्पिटलसाठी जागा मिळणे कठीण आहे, त्यामुळे सद्य:स्थितीतच सदर रुग्णालयाची क्षमता २०० खाटांपर्यंत वाढविणे गरजेचे, सबब लोहगाव येथील उपजिल्हा रुग्णालयाची क्षमता १०० खाटांवरून २०० खाटांपर्यंत वाढविण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-९**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १४१, रूपये:- १,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (४३) | ७४५ | १० | सांगोला ग्रामीण रूग्णालय जिल्हा सोलापूर येथील मुख्य इमारतीचे नुतनीकरण व अधिकारी कर्मचारी निवासस्थानाचे बांधकाम करण्यासाठी तसेच अंतर्गत रस्ते व संरक्षक भिंत बांधणे आवश्यक आहे तरी सांगोला ग्रामीण रूग्णालय येथील मुख्य इमारतीची दुरूस्ती व कर्मचारी निवासस्थानाचे बांधकाम करण्यासाठी शासनाने निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : ८ जुलै, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सार्वजनिक बांधकाम विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई